गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी -४ महाराष्ट्र विपीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनिम क्रमांक (६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

कुलसचिव कार्यालय

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५ फोन /फॅक्स नंबर ०७१३२ - २२३२०४
Email-gug.registrar@gmail.com

जा.क्र./गोवि/कुलका/ ६८१४ /२०२५ दि. १४/ ०८ /२०२५

परिपत्रक

विषय :- अधिछात्रवृत्ती करीता बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य बाबत...

संदर्भ :- महाज्योती / संशोधन विभाग / १३४५ / २०२५-२६ दि.२५ / ०४/ २०२५

या परिपत्रकाद्वारे सर्व संलग्नित महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था / संशोधक केंद्र यांना कळविण्यात येते की, पीएच.डी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्तरावरील विविध अनुदान संस्थांकडून उदा. सारथी, बार्टी, महाज्योती, विद्यापीठ अनुदान आयोग व इतर तत्सम संस्था यांच्याकडून शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते, सदर संस्थाकडून संबंधित शिष्यवृत्तीबाबत मार्गदर्शिकेत नमूद केल्यानूसार संशोधक विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत आवश्यक ती कार्यवाही संबंधित महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था / संशोधक केंद्रांनी आपल्या स्तरावर करावी.

डॉ. अनिल हिरेखण
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,
मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य
सर्व सलंग्नित महाविद्यालये,
मान्यताप्राप्त परिसंस्था,सर्व संशोधन केंद्र,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी : १) मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. प्र-कुलगरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

टिप : सदर परिपत्रक आपल्या महाविद्यालय/ मान्यताप्राप्त परिसंस्था / संशोधक केंद्रानी संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती.

Scanned with OKEN Scanner

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी -४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनिम क्रमांक (६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

कुलसचिव कार्यालय

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५ फोन /फॅक्स नंबर ०७१३२ - २२३१०४
Email-gug.registrar@gmail.com

जा.क्र./गोवि/कुलका/ ६८१५ /२०२५ दि.१४/ ०८ /२०२५

प्रती,
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतीबा फुले
संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य,नागपूर ३ ४४००२२

विषय :- अधिछात्रवृत्ती करीता बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य बाबत...
संदर्भ :- महाज्योती / संशोधन विभाग / १३४५ / २०२५-२६ दि.२५ / ०४/ २०२५

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन महाज्योतीकडून दिल्या जाणाऱ्या अधिछात्रवृत्ती करीता बायोमॅट्रिक हजेरी अनिवार्य असल्याबाबत परिपत्रक महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेले आहे.

गोंडवाना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा या भागातील संशोधन केंद्रामध्ये विद्यार्थी आपल्याकडे योजनेसाठी अर्ज करीत असतात. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात जवळपास अधिक संशोधन केंद्र कार्यान्वीत आहेत. प्रत्येक संशोधन केंद्रातील अधिछात्र फक्त हजेरी पत्रकावर स्वाक्षरीसाठी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे येऊन कुलसचिवांची स्वाक्षरी घेणे विद्यार्थ्यांसाठी अत्यंत गैरसोईचे आहे. याबाबतची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे दर्शवित आहोत.

१. महाज्योती अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थी हे त्यांच्या संबंधित अधिविभागप्रमुख व संबंधित मार्गदर्शक यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनाचे काम करीत असतात.
२. विद्यार्थ्यांचे संशोधनाचे मूल्यमापन हे अधिविभागस्तरावर व त्यांचे मार्गदर्शक यांच्या स्तरावर होत असते. विद्यार्थ्यांच्या अधिछात्रवृत्ती मंजुरी पत्र दिनांकापासून विद्यापीठामध्ये त्यांची Bio-Matric हजेरी घेतली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा Bio-Matric हजेरी पत्रकावर मा.कुलसचिव यांची स्वाक्षरी घेऊन ग्रमाणित करणे संयुक्तिक नाही. तसेच नोंदणी दिनांक पासूनची सर्व हजेरी मा. कुलसचिव यांनी प्रमाण्णित करणे हे तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही.
३. तसेच अन्य अधिछात्रवृत्ती देणाऱ्या संस्थांकडून अशा प्रत्येक उपस्थिती प्रमाणपत्रावर स्वाक्षरी मागणी केली जात नाही. त्याचप्रमाणे विद्यार्थी उपस्थिती आणि कुलसचिवांचा कोणताही संबंध येत नसल्याने त्या कागदपत्रावर स्वाक्षरी करणे संयुक्तीक नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन, आपणास कळविण्यात येते की, संबंधीत संशोधन केंद्रातील प्राचार्य/ मार्गदर्शक /संचालक/अधिविभाग प्रमुख यांची स्वाक्षरी ग्राहय धरुन महाज्योती कडून अधिछात्रवृत्तीधारक विद्यार्थ्यांना छात्रवृत्ती अदा करण्याची कार्यवाही करावी.

कळावे!

डॉ. अनिल हिरेखण
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी:- १) मा.कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.
२) मा.प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.

Scanned with OKEN Scanner